शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

# श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,

**पिपरी, वर्धा – ४४२००१**

संलग्न : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट रासेयो महाविद्यालय एकक पुरस्कार प्राप्त पथक - २०१६

# नियमित उपक्रम

## २०१८ – २०१९

**डॉ. राजेश देशपांडे**
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी-वर्धा

**डॉ. पुरूषोत्तम कालभूत**
प्राचार्य
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी-वर्धा

शिक्षा मंडल, वर्धा द्वारा संचालित,

श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी-वर्धा

(विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट रासेयो महाविद्यालय एकक पुरस्कार प्राप्त पथक)

# राष्ट्रीय सेवा योजना पथक

## नियमित उपक्रम अहवाल २०१८—२०१९

सत्र २०१८—२०१९ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित उपक्रमांना जून २०१८ पासून प्रारंभ झाला. नियमित उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दीष्ट्ये, स्वयंसेवकाची कर्तव्ये, स्वयंसेवकाची आचारसंहिता, स्वयंसेवकाची सामाजिक बांधिलकी इत्यादींबाबत त्यांच्यात जागृती निर्माण करून युवक युवतींना राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी केले जाते. नियमित उपक्रमांतर्गत श्रमसंस्कार, बौद्धिक, सांस्कृतिक व व्यक्तिमत्त्व विकासाचे कार्यक्रम वर्षभर आयोजित करण्यात आले. दर शनिवारी दुपारी १.०० ते २.०० वा. या वेळेत नियमित उपक्रम घेण्यात येतात.

**नोंदणी व प्रशिक्षण कार्यशाळा :**

नोंदणी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना प्रशिक्षण कार्यशाळेच्या माध्यमातून रा.से.यो. उपक्रमाविषयी व वर्षभर चालणाऱ्या प्रकल्पाविषयी माहिती देण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत, उपप्राचार्य प्रा. सुरेश पवार तसेच डॉ. रतन चौधरी ह्यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेचे उद्‌घाटन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून झाले. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजनाबाबत भूमिका विशद केली. याप्रसंगी उपस्थित रा.से.यो. छात्रसेवकांना मार्गदर्शन करताना डॉ. रतन चौधरी म्हणाले की, ''विद्यार्थ्यांनी रा.से.यो. उपक्रमांमध्ये अत्यंत अत्मियतेने सहभागी व्हायला हवे. कारण रा.से.यो. व्यक्तिमत्त्व विकासाचे केंद्र आहे'' उपप्राचार्य प्रा. सुरेश पवार म्हणाले की, “रा.से.यो.च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजसेवेची संधी प्राप्त होते. विद्यार्थ्यांनी समाजसेवेचे व्रत स्वीकारून समाजाच्या विकासात आपले योगदान द्यावे.” महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत या प्रसंगी मार्गदर्शन करताना म्हणाले की, “राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून होणारे कार्य हे महात्मा गांधींच्या विचारांचेच मूर्त रूप आहे. आज मानव हा आत्मकेंद्रित होत आहे. रा.से.यो. आम्हाला समाजकेंद्री बनवते. सकारात्मकता, विचार परिवर्तन, श्रमप्रतिष्ठा, नम्रता आत्मविश्वास व सहकार्याची भावना इ. गुणांचा परिपोष आमच्यात करण्याचे सामर्थ्य रा.से.यो. मध्ये आहे. इतरांना काहितरी देण्याचा आनंद घेणे हाच रा.से.यो.चा अर्थ आहे” या प्रसंगी विद्यार्थ्यांना रा.से.यो. अंतर्गत नियमित चालणारे उपक्रम व विशेष शिबिराविषयी माहिती देण्यात आली. “खरा तो एकची धर्म” या गीताने कार्यशाळेची सांगता झाली.

## आंतरराष्ट्रीय योग दिवस:

महाविद्यालयात २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून रासेयो पथक व शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. प्रियंका घुमे हिने प्राणायाम व विविध आसन प्रात्यक्षिकाद्वारे करून दाखविले व त्याचबरोबर डॉ. सुशील चव्हाण यांनी आसनांची शास्त्रोक्त माहिती दिली. तसेच आसन व प्राणायाम यांचे महत्त्व सांगून यामध्ये नियमितता असल्यास चांगल्या प्रकारे लाभ मिळतो. म्हणून विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी आपले आरोग्य उत्तम ठेवण्याकरिता आसन व प्राणायाम नियमितपणे करण्यास भर द्यावा असे आवाहन केले. प्रा. डॉ. पुरूषोत्तम कालभूत यांनी योगासन व आरोग्य यांचा मेळ राखून आपण आपले जीवन आनंदी ठेवावे असे सांगितले. या कार्यक्रमात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतार कर्मचारी सहभागी झाले.

## वृक्षारोपण व संवर्धन :

महाविद्यालयात रा.से.यो. पथकाद्वारे महाराष्ट्र शासनाच्या १३ कोटी वृक्षलागवड उपक्रमा अंतर्गत दि. २३ ते २८ जुलै दरम्यान महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. तसेच वृक्षफेरी काढून वृक्षसंवर्धनाचा संदेश दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कालभूत यांनी वृक्षांचे मानवी जीवनातील महत्त्व विशद करून सृष्टीचा समतोल राखायचा असेल तर वृक्षांची नितांत गरज असल्याचे सांगितले. वृक्षांची केवळ लागवड करून थांबू नये तर त्याच्या रक्षणाची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकावयास हवी व हा संदेश रासेयो स्वयंसेवकांनी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्याची चोख कामगिरी बजावावी असे आवाहन केले. प्रा. शैलेंद्र जांभूळकर यांनी 'वृक्षारोपण आणि संवर्धन' याबाबत याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. मिलिंद माने यांनी भावी पिढीला जर प्रदूषणाच्या विळख्यातून वाचवायचे असेल तर या पिढीतील प्रत्येकाने निदान एक तरी वृक्ष लावणे, त्याची जोपासना आणि संवर्धन करणे नितांत आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

महाविद्यालय परिसरात एकूण ७० झाडांची लागवड करण्यात आली. वृक्षारोपण कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश देशपांडे यांनी केले. महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यांत आले. यामध्ये कडूनिंब, कन्हेर या झाडांचा समावेश होता. याप्रसंगी वृक्षसंवर्धानाचा संकल्प सर्वांनी केला.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयात 'एक विद्यार्थी एक वृक्ष' मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी झाले.

## स्वच्छता पंधरवडा :

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ०१ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पर्यंत स्वच्छता पंधरवडा राबविण्यात आला. याप्रसंगी सर्वप्रथम विद्यार्थ्यांना सामुहिक स्वच्छता शपथ देण्यात आली. 'स्वच्छता : एक सवय' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. राजकुमार मून म्हणाले की, 'परिसर स्वच्छता जेवढी महत्त्वाची आहे तेवढीच मनाची स्वच्छताही महत्त्वाची आहे'. उपप्राचार्य प्रा. सुरेश पवार म्हणाले की, 'स्वच्छता ही उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली आहे' प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत म्हणाले की, 'स्वच्छ वातावरण मनाला प्रसन्न करते त्यामुळे प्रत्येकाने स्वत:ला स्वच्छतेची सवय लावून घ्यायला हवी' स्वच्छता पंधरवडानिमित्ताने रा. से. यो. विभागांतर्गत प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत व कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे ह्यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले व प्लास्टिक निर्मूलन, गाजरगवत निर्मूलन करण्यात आले. स्वच्छता अभियानात महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले.

## स्वच्छता सर्वेक्षण :

शासनाच्या स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत 'स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण – २०१८' या सर्वेक्षणात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथकातील स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. **'SSg18'** हे ॲप्लिकेशन आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करून विद्यार्थ्यांनी त्यावर आपल्या प्रतिक्रिया नोंदविल्या.

## मतदार नोंदणी अभियान :

सत्र २०१८–१९मध्ये महाविद्यालयात मतदार नोंदणी अभियान रासेयो पथकाद्वारे राबविण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. प्रा. डॉ. पुरूषोत्तम कालभूत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तहसिल कार्यालय, वर्धा येथून मतदार नोंदणी फॉर्म क्र. ६ प्राप्त करून घेतले. विद्यार्थ्यांना मतदार नोंदणीबाबतची माहिती देऊन आवश्यक कागदपत्रासह फॉर्म भरून घेण्यात आले. विद्यार्थ्यांचे मतदार नोंदणी फॉर्म मा. तहसीलदार पंचायत समिती निवडणूक विभाग, वर्धा यांना सादर करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाइन मतदार नोंदणीकरिता www.eco.maharashtra.gov.in या वेबसाइटचा उपयोग करावा असे आवाहन करण्यात आले.

२५ जानेवारी २०१९ रोजी जिल्हा निवडणूक कार्यालय, वर्धा द्वारा जिल्हा क्रीडा संकुल, वर्धा येथे राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयातील रा.से.यो. पथकाचे ५० स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे व डॉ. राजकुमार मून सहभागी झाले. याप्रसंगी माननीय श्री. शैलेश नवाल, जिल्हाधिकारी, वर्धा. ह्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

दै. लोकमत या वृत्तपत्राच्या 'मतदारांशी थेट संवाद' या उपक्रमात महाविद्यालयातील रा.से.यो. पथकाच्या सुशील धुर्वे, नितीन गुल्हाने, सुमित ढोक, निलेश बोबडे, ऋषिकेश भोंडे, कु. पायल शेंडे, कु. मुक्ता भोयर, व कु. पल्लवी राऊत सहभागी झाले.

**रक्तदान शिबिर :**

तपोधन श्रीकृष्णदास जाजू जयंतीच्या निमित्ताने महाविद्यालयात रासेयो पथकाच्या वतीने दि. २९ ऑगस्ट २०१८ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व पटवून देवून रक्तदानाकरिता प्रोत्साहित करण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये एकूण २१ विद्यार्थी, स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी रक्तदान केले. तसेच विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी केली.

शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व महात्मा गांधी आयुर्विज्ञान महाविद्यालय, सेवाग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. रक्तदान शिबिराचे समन्वयक प्रा. सुरेश महाजन, डॉ. राजेश देशपांडे व प्रा. शिरिष सुतार यांनी विद्यार्थ्यांना रक्तदानाचे महत्त्व सांगून रक्तदानाकरिता प्रेरित केले. शिबिर यशस्वीतेकरिता विद्यार्थी, स्वयंसेवक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे विशेष सहकार्य लाभले.

**रासेयो वर्धापन दिन :**

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाच्या वतीने २४ सप्टेंबर हा दिवस रासेयो वर्धापन दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत, उपप्राचार्य प्रा. सुरेश पवार ह्यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात रा.से.यो. ध्वजारोहण, मानवंदना व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून झाली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विद्यापीठगीत व रा.से.यो. गीत सादर केले. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे यांनी प्रास्ताविकातून रा.से.यो.च्या निर्मिती व कार्याबाबत भूमिका विशद केली. याप्रसंगी उपस्थित रा.से.यो. छात्रसेवकांना मार्गदर्शन करताना उपप्राचार्य प्रा. सुरेश पवार म्हणाले की, "रा.से.यो.च्या माध्यमातून तरूण समाजाशी जोडले जातात. विद्यार्थ्यांनी अत्यंत अत्मियतेने समाजाच्या विकासात आपले योगदान द्यावे." महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत याप्रसंगी मार्गदर्शन करताना म्हणाले की, "राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांच्या संघटित शक्तीचे दर्शन घडते. निरपेक्ष भावनेने कार्य करणारा व सकारात्मक दृष्टिकोन असलेला रा.से.यो.चा स्वयंसेवक परिस्थितीनुसार स्वत:मधे बदल करण्याची क्षमता ठेवतो तसेच राष्ट्रीय व सामाजिक आपत्तीच्या वेळेस धावून जातो.'' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहकार्यक्रम अधिकारी प्रा. मिलिंद माने यांनी तर आभार प्रदर्शन निलेश बोबडे यांनी केले. "खरा तो एकची धर्म" या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

**राष्ट्रपिता महात्मा गांधी १५० वी जयंती सप्ताह :**

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त दि. २६ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०१८ या सप्ताहात विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात परिसर स्वच्छतेबरोबरच वृक्षसंवर्धनाचे कार्य केले. महाविद्यालयाच्या परिसरात लावण्यात आलेल्या विविध रोपांना आळी करून त्यांना पाणी देऊन त्यांचे संगोपन करण्यात आले.

**आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन पदयात्रा :**

दि. ०२ ऑक्टोबर २०१८ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व जागतिक अहिंसा दिन साजरा करण्यात आला. मातृसंस्था शिक्षा मंडल, वर्धा च्या नेतृत्वात या निमित्ताने वर्धा शहरात पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या दरम्यान समाजप्रबोधनपर घोषवाक्य, गीत, देशभक्तीपर गीत, स्वच्छता, पर्यावरण, व्यसनमुक्ती बाबत घोषवाक्ये व नारे देण्यात आले. या पदयात्रेत विद्यार्थ्यांनी वर्धा शहरातील विविध मार्गांहून मार्गक्रमण करत अहिंसेचा संदेश जनमानसापर्यंत पोहचविला. जा. ब. विज्ञान महाविद्यालय, वर्धा येथे या पदयात्रेची सांगता झाली. याप्रसंगी ज्येष्ठ गांधीवादी श्री. बालविजयजी, पवनार आश्रम यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. या पदयात्रेत शिक्षा मंडल, वर्धा संचालित सर्व महाविद्यालयांचे विद्यार्थी, स्वयंसेवक, प्राध्यापक व कर्मचारी सहभागी झाले होते.

**संविधान दिन:**

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने दिनांक २६ नोव्हेंबर २०१८ रोजी संविधान दिनानिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत व प्रमुख पाहुणे प्रा. बी. एन. जक्कुलवार ह्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून झाली. याप्रसंगी उपस्थित मान्यवर, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत भूमिका विशद केली. याप्रसंगी उपस्थिताना मार्गदर्शन करताना प्रा. बी. एन. जक्कुलवार म्हणाले की, “प्रत्येकाने राज्यघटनेचा अभ्यास करायला हवा. भारतीय राज्यघटना हा केवळ एक ग्रंथ नसून ती एक जीवनपद्धती आहे. या जीवनपद्धतीचा प्रत्येकाने अंगिकार करायला हवा” महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत याप्रसंगी मार्गदर्शन करताना म्हणाले की, “आपण आपले धर्मग्रंथ जसे श्रद्धेने वाचतो तशीच भारतीय राज्यघटना वाचावी. संविधान आम्हाला आमच्या अधिकार व कर्तव्याची जाणीव करून देते. नीतिमान व कर्तव्यतत्पर युवकच राष्ट्राच्या उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात.'' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजेश देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन कु. गायत्री काकडे यांनी केले. “खरा तो एकची धर्म” या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**शिबिरपूर्व प्रशिक्षण कार्यशाळा :**

महाविद्यालयाच्या रासेयो पथकाद्वारे सुनियोजितपणे विशेष शिबिराचे आयोजन केले जाते. शिबिराबाबत स्वयंसेवकांना विस्तृत माहिती देणे तसेच शिबिराची आचारसंहिता अवगत करून देण्याच्या उद्देशाने दि. ०५ डिसेंबर २०१८ रोजी शिबिरपूर्व प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरूषोत्तम कालभूत यांनी स्वयंसेवकांना शिबिराची दिनचर्या, विविध उपक्रम, नियम व अटी, शिस्त पालन, पालकांची सहमती, शिबिरस्थळी स्वयंसेवकाची व्यवस्था याबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश देशपांडे यांनी केले.

**राष्ट्रीय युवा दिन :**

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्य दिनांक १२ जानेवारी २०१९ रोजी वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत व प्रमुख पाहुणे प्रा. मिलिंद माने ह्यांची उपस्थिती होती. वक्तृत्त्व स्पर्धेत ०६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन अनुक्रमे कु. निकिता अवथळे व कु. श्रद्धा घोंगडे यांनी केले.

**सांप्रदायिक सद्भावना निधी संकलन:**

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने राष्ट्रीय साम्प्रदायिक सद्भाव प्रतिष्ठान, नवी दिल्ली अंतर्गत साम्प्रदायिक सद्भाव व राष्ट्रीय एकात्मता कार्यात सहभाग म्हणून रू. ५३१०/- निधी संकलित करून मा. सचिव, राष्ट्रीय साम्प्रदायिक सद्भाव प्रतिष्ठान, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्यात आला. या कार्यात महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

**विविध उपक्रम /शिबिरात सहभाग:**

**रासेयो वार्षिक नियोजन सभा:**

दिनांक १७ जुलै २०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेची वार्षिक नियोजन सभा मा. सिद्धार्थविनायक काणे, कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर ह्यांच्या अध्यक्षतेखाली गुरुनानक भवन, नागपूर येथे संपन्न झाली सदर सभेला डॉ. केशव वाळके, संचालक राष्ट्रीय सेवा विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर, यांची उपस्थिती होती. यामध्ये रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणी, वर्षभरात घेण्यात येणारे विविध उपक्रम याबाबत चर्चा करून नियोजन करण्यात आले.

**जिल्हास्तरीय शिबिर:**

दि. २६ मार्च ते २८ मार्च २०१९ दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना आणि प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा यांच्या संयुक्त विद्यमाने 'जीवन कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन कार्यशाळा' आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेत महाविद्यालयातून रासेयो स्वयंसेवक कु. श्रद्धा घोंगडे, बी.ए. (आर.एस.) भाग –१, कु. शितल मोडक, बी.ए. (आर.एस.) भाग –१, कु. आफरीन खान, बी.ए. (आर.एस.) भाग –१, इर्शाद पटेल, बी.ए. (आर.एस) भाग –१, निलेश बोबडे, बी.ए. (आर.एस.) भाग –१ व श्रीपाल मारवाडे, बी.ए. (आर.एस.) भाग –१ सहभागी झाले होते.

दि. ११ व १२ सप्टेंबर २०१८ रोजी गांधी विचार परिषद, गोपुरी, वर्धा द्वारा 'युवा, सामाजिक दायित्व व संघटन' या विषयावर आयोजित दोन दिवसीय जिल्हास्तरीय शिबिरात महाविद्यालयातून रासेयो स्वयंसेवक निलेश बोबडे, बी.ए. (आर.एस.) भाग –१, ऋषिकेश काळे, बी.ए. (आर.एस.) भाग –१, योगेश शेंडे, बी.ए. (आर.एस.) भाग –३ व मयूर लिचडे, बी.ए. (आर.एस.) भाग –३ सहभागी झाले होते.

**प्रजासत्ताक दिन पथसंचालन निवड प्रक्रिया सहभाग :**

दि. ०४ ऑगस्ट २०१८ रोजी यशवंत महाविद्यालय, वर्धा येथे प्रजासत्ताक दिन पथसंचालन रा.से.यो. स्वयंसेवकाची जिल्हास्तरीय निवड प्रक्रिया पार पडली त्यात महाविद्यालयातून सूरज माजरखेडे बी. ए. (आर. एस. ) भाग –३ कु. मोनाली सोनवणे बी. ए. (आर. एस.) भाग –३ व कु. वैशाली गोटे बी. ए. (आर. एस.) भाग –२ सहभागी झाले होते त्यापैकी कु. मोनाली सोनवणे व कु. वैशाली गोटे यांची जिल्हास्तरावर निवड झाली व या दोन विद्यार्थिनी दि. ०८ ऑगस्ट २०१८ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, गुरुनानक भवन, विद्यापीठ परिसर, नागपूर येथे पुढील निवड प्रक्रियेत सहभागी झाल्या त्यात कु. वैशाली गोटे हिची निवड झाली व ती दि. ०८ व ०९ सप्टेंबर २०१८ रोजी पुणे येथे झालेल्या पुढील निवड प्रक्रियेत सहभागी झाली.

**महात्मा गांधी यांची १५० वी जयंती सभा:**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्य अहिंसा दिन कार्यक्रम नियोजन समितीच्या सभा दि. १० सप्टेंबर २०१८ व दि. १७ सप्टेंबर २०१८ रोजी गांधी विचार परिषद, गोपुरी, वर्धा येथे आयोजित करण्यात आल्या या सभांना रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे उपस्थित होते.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्य जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे दि. १५ सप्टेंबर २०१८ रोजी 'सेवाग्राम कार्यांजली सभा' आयोजित करण्यात आली या सभेला महाविद्यालयातून रासेयो स्वयंसेवक नितीन गुल्हाने, शुभम शंभरकर, हेमंत आसटकर, गौरव कालोकार व ऋषिकेश भोंडे उपस्थित होते.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंती निमित्य मा. जिल्हाधिकारी, वर्धा ह्यांच्या अध्यक्षतेत दि. २४ सप्टेंबर २०१८ रोजी 'सेवाग्राम कार्यांजली सभा' आयोजित करण्यात आली या सभेला रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे उपस्थित होते.

**युवा संसद निवड प्रक्रिया सहभाग:**

दिनांक १८ जानेवारी २०१९ रोजी प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जिल्हास्तरीय युवा संसद' निवड प्रक्रिया पार पडली त्यात महाविद्यालयातून रासेयो स्वयंसेवक कु. श्रद्धा घोंगडे, बी.ए. (आर.एस.) भाग –१, कु. रोहिणी खडसे, बी.ए. (आर.एस.) भाग –१, कु. गौसिया शेख, बी.ए. (आर.एस.) भाग –२, निलेश बोबडे, बी.ए. (आर.एस.) भाग –१, शुभम उमाटे, बी.ए. (आर.एस.) भाग –३ व रूपेश कोठाळे, बी.ए. (आर.एस.) भाग –३ सहभागी झाले होते. यापैकी कु. श्रद्धा घोंगडे, कु. रोहिणी खडसे या दोन विद्यार्थिनींनी दिनांक २५ जानेवारी २०१९ रोजी 'राज्यस्तरीय युवा संसद' निवड प्रक्रियेत महाविद्यालयाचे प्रतिनिधित्त्व केले.

**डॉ. राजेश देशपांडे**
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी-वर्धा

**डॉ. पुरूषोत्तम कालभूत**
प्राचार्य
श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय,
पिपरी-वर्धा

# नियमित उपक्रम क्षणचित्रे



प्रशिक्षण कार्यशाळा



प्रशिक्षण कार्यशाळा



वृक्षारोपण आणि संवर्धन



वृक्षारोपण आणि संवर्धन



परिसर स्वच्छता



स्वच्छता शपथ

# नियमित उपक्रम क्षणचित्रे



स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण – २०१८ सहभाग



राष्ट्रीय मतदार दिन



रक्तदान शिबिर



रासेयो वर्धापन दिन



संविधान दिन



राष्ट्रीय युवा दिन

लोकमत शनिवार, दि. ८ सप्टेंबर २०१८ २

## थोडक्यात जिल्हा



# स्वच्छता पंधरवडा

**वर्धा :** श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने स्वच्छता पंधरवाडा राबविण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना सामुहिक स्वच्छता शपथ देण्यात आली. 'स्वच्छता एक सवय'या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. राजकुमार मून म्हणाले की, परिसर स्वच्छता जेवढी महत्वाची आहे. तेवढीच मनाची स्वच्छताही महत्वाची आहे. उपप्राचार्य प्रा. सुरेश पवार म्हणाले की, स्वच्छता ही उत्तम आरोग्याची गुरुकिल्ली आहे. प्राचार्य डॉ. पुरूषोत्तम कालभूत म्हणाले की, स्वच्छ वातावरण मनाला प्रसन्न करते. त्यामुळे प्रत्येकाने स्वत:ला स्वच्छतेची सवय लावून घ्यायला हवी. स्वच्छता पंधरवडानिमित्ताने रा.से.यो. विभागांतर्गत प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत व कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

देशोन्नती शनिवार, दि. १८ ऑगस्ट २०१८

# वर्धा Live

## वृक्षांशी मैत्री करा : डॉ.कालभूत

*प्रतिनिधी / १७ ऑगस्ट*



**वर्धा** : आपल्या वसुधेला सुजलाम सुफलाम ठेवावयाचे असेल तसेच पर्यावरणाचा ढासळणारा तोल सांभाळायचा असेल तर वृक्ष लागवडी शिवाय पर्याय नाही. मानवी जीवनात वृक्षांना अत्यंत महत्व आहे. दैनंदिन जीवनात वृक्ष हाच मानवाचा मित्र असल्यामुळे वृक्षांशी मैत्री करा असा मोलाचा सल्ला शिक्षा मंडल वर्धा द्वारा संचालीत श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पुरुषोत्तम कालभूत यांनी विद्यार्थ्यांना दिला. महाराष्ट्र शासनाच्या १३ कोटी वृक्षलागवडी अंतर्गत महाविद्यालयाच्या रा.से.यो. विभागद्वारा आयोजीत वृक्षारोपण कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाच्या परिसरात शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षरोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी वृक्षरोपणाचा तसेच वृक्षसंवर्धनाचा संकल्प करुन आपापल्या गावात तसेच घरांजवळील परिसरात वृक्षलागवड करण्याची प्रतिज्ञा केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी डॉ.राजेश देशपांडे यांनी केले. याप्रसंगी प्रा.मिलींद माने, डॉ.रतन चौधरी, प्रा.जांभूळकर, प्रा.महाजन, प्रा.शेख व प्रा.भारद्वाज ह्यांची विशेष उपस्थिती होती.

लोकमत
हॅलो वर्धा
शनिवार, दि. २२ सप्टेंबर २०१८




## जाजू महाविद्यालयात कार्यशाळा

**वर्धा :** श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय पिपरी येथे रा.से.यो. प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत, उपप्राचार्य प्रा. सुरेश पवार, डॉ. रतन चौधरी उपस्थित होते. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे यांनी प्रास्ताविकातून कार्यशाळा आयोजनाबाबत भूमिका विशद केली. याप्रसंगी विद्यार्थ्यांना रासेयो अंतर्गत नियमित चालणारे उपक्रम व विशेष शिबिराविषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. शेवटी 'खरा तो एकची धर्म' या गीताने कार्यशाळेची सांगता झाली.

लोकमत
# हॅलो वर्धा
रविवार, दि. ३० सप्टेंबर २०१८



## जाजू महाविद्यालयात रासेयो वर्धापनदिन -

**वर्धा :** श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय पिपरी येथे रासेयो वर्धापन दिन कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत, उपप्राचार्य प्रा. सुरेश पवार उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विद्यापीठगीत व रासेयो गीत सादर केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेश देशपांडे यांनी प्रास्ताविकातून रासेयोच्या निर्मिती व कार्याबाबत भूमिका विशद केली. याप्रसंगी उपस्थित रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना उपप्राचार्य प्रा. सुरेश पवार म्हणाले की, रासेयोच्या माध्यमातून तरुण समाजाशी जोडले जातात. कार्यक्रमाचे संचालन सहकार्यक्रम अधिकारी प्रा. मिलींद भाने यांनी केले तर आभार निलेश घोबडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

लोकमत
हॅलो वर्धा
शुक्रवार, दि. ३० नोव्हेंबर २०१८

# संविधानदिन कार्यक्रम साजरा




जाजू महाविद्यालयात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. पुरूषोत्तम कालभूत

## जाजू महाविद्यालय

वर्धा : श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय पिपरी येथे रासेयो पथकाच्यावतीने कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. पुरूषोत्तम कालभूत होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.बी.एन. जफ्फुलवार उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजेश देशपांडे यांनी केले. संचालन डॉ. राजेश देशपांडे यांनी केले तर आभार गायत्री काकडे यांनी मानले. यशस्वीतेकरिता शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

# देशोन्नती



नागपूर मंगळवार, दि. २२ जानेवारी २०१९ पृष्ठे ८+८ मूल्य ₹:६


# विवेकानंदांचे विचार आत्मसात केल्यास युवावर्ग उज्ज्वल राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यास सक्षम होईलः डॉ. पुरुषोत्तम कालभूत

## जाजू महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन



प्रतिनिधी / २१ जानेवारी

**वर्धा :** येथील श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय पिपरी येथे सांस्कृतिक कार्यक्रम विभाग व रासेयो पथकाच्या विद्यमाने स्वामी विवेकानंद जयंती राष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करीत माल्यार्पण करून या मान्यवर बंधुभाव या विद्यापीठ गीताने करण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कालभूत, प्रा. मिलिंद माने, रासेयोचे डॉ. राजेश देशपांडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. मिलिंद माने म्हणाले की, विवेकानंदांचे जीवन युवकांसाठी प्रेरणादायी व स्फूर्तीदायक आहे. युवकांनी त्यापासून प्रेरणा घेत आपल्या भविष्याची वाटचाल करावी. तर डॉ. देशपांडे म्हणाले की, युवकांनी आपल्या व्यक्तिमत्वाच्या चौफेर विकासात चारित्र्य संपन्नतेला सर्वोच्च स्थान दिले पाहिजे. मार्गदर्शन करतांना डॉ. पुरुषोत्तम कालभूत म्हणाले की, युवकांना आपल्या जबाबदारीची जाणीव असावयास पाहिजे. आपली कथनी व करणी यात अंतर असू नये. विकासाच्या मार्गात सचरित्र शक्तीची नितांत गरज असते. विवेकानंदांचे विचार आत्मसात केल्यास युवकवर्ग उज्ज्वल राष्ट्राचे स्वप्न पूर्ण करण्यास सक्षम होईल. याप्रसंगी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेत पौर्णिमा शेख, कोमल कोरडे, श्वेता [illegible] या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय पारितोषिके [illegible] प्राप्त केले. [illegible] संचालन निकीता [illegible], व आभार [illegible] यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता [illegible] एकात्मता [illegible] करण्यात आली.

**मतदारांशी थेट संवाद** तरुणांच्या मनात आहे तरी काय? । कोणता मुद्दा आहे महत्त्वाचा? । 'लोकमत'चे कट्ट्यावरुन रिपोर्टिंग

# स्वहितापेक्षा सामाजिक भान जपणाऱ्या नेत्यालाच प्राधान्य द्यावे!

## पद सांभाळण्याची क्षमता असलेल्यांनाच मतदान



[illegible] पद सांभाळण्याची [illegible] आहे. जो आपला [illegible] पूर्ण वेळ देशासाठी व समाजासाठी देऊ शकेल, अशाच उमेदवाराला मतदान करणार आहे. जातीचे राजकारण करणारा नेता नसावा तर तो समाजात एकीचे वज्र निर्माण करणारा आणि विकासाची गंगा आणणारा असावा. देशातील बेरोजगारी, शेतकऱ्यांच्या समस्या यावर लक्ष केंद्रित करायला हवे. जोपर्यंत देशाचा पोशिंदा उपाशी राहील, तोपर्यंत देशाचा सर्वांगीण विकास अशक्य आहे.

- सुशील अ. धुर्वे, पानवाडी, ता.आर्वी.

## सरकारला दिलेल्या आश्वासनांचा विसर

[illegible] २०१४ च्या निवडणुकीदरम्यान या सरकारने आश्वासनांची खैरात वाटली होती. पण, त्या आश्वासनांची अद्यापही पूर्तता झालेली नाही. परिणामी, शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी, लोकपाल बिल, भूमिहीन कायदा, स्वामिनाथन आयोग आदी प्रश्न प्रलंबित आहे. त्यामुळे समस्यांचा डोलारा कायम आहे. हिटलरशाही सुरु असून संविधानाला धक्का लावण्याचा प्रकार सुरु आहे.



- नितीन गुल्हाणे, पिपरी(मेघे), ता.वर्धा.

## शेती क्षेत्राविषयी ठोस निर्णयाची गरज



[illegible] युवा वर्गाच्या प्रश्नांबाबत कोणतीही चर्चा होत नाही. रोजगाराच्या प्रश्नालाही दुर्लक्षित केले जात आहे. विशेषत: जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयीही सरकार उदासीन दिसत आहे. शेती क्षेत्राविषयी ठोस निर्णय घेण्याची गरज आहे.

- पायल ज्ञा. शेंडे, वर्धा, ता.वर्धा.

## दोन 'एम'च्या भरवशावरच राजकारण



[illegible] असावा. आपल्याला सुजलाम् सुफलाम् देशाची निर्मिती करण्याकरिता चारित्र्यवान, सुशिक्षित आणि समाजाप्रति आस्था असलेल्या उमेदवारालाच संधी द्यायला हवी. राजकारणात आता तरुणांची आवश्यकता असून तशी उपलब्धताही असावी.

- मुक्ता सं. भोयर, वर्धा,ता.वर्धा.

## अंतरात्म्याचा ठाव घेऊन मतदान करावे



[illegible]

- [illegible] प्र. [illegible], वर्धा, ता.वर्धा.

Hello Wardha
Page No. 4 Apr 02, 2019
Powered by: erelego.com

मतदारांशी थेट संवाद | तरुणांच्या मनात आहे तरी काय? । कोणता मुद्दा आहे महत्त्वाचा? । 'लोकमत'चे कट्ट्यावरुन रिपोर्टिंग

# शेती समस्या आणि बेरोजगारीवर ठोस उपाययोजना करण्याची गरज

## आश्वासनाची खैरात नाही तर पूर्तता करणारे हवे



निवडणुकीचा काळ आला की, नेत्याकडून मोठ-मोठी आश्वासने दिली जाते. सत्तेत येताच आश्वासन पुर्ण करणार असल्याचे वचनावून सांगतात. पण, कालावधी निघून जातो तरीही आश्वासनाची पूर्तता होत नाही. त्यामुळे आश्वासनाची खैरात नाही तर पूर्तता करणाऱ्यांना माझं मत आहे. निवडून आल्यानंतर शेतकरी, कामगार व युवकांच्या समस्या सोडविण्याकरिता प्राधान्याने पुढाकार घ्यायला हवा. प्रारंभी निवडणुकांना सामाजिक जाणीव व समाजातील वास्तव कळायला हवे.

- पल्लवी प्र. राऊत, वर्धा, ता.वर्धा

## रस्त्यांपेक्षा शेतीच्या विकासावर भर द्यावा

आपला देश हा कृषी प्रधान असतानाही कृषी व्यवस्था पुर्णत:कोलमडलेली दिसून येत आहे.



मागील पाच वर्षाचा विचार केल्यास या कालावधीत रस्ते व महामार्गाच्या विकासावरच भर देण्यात आला आहे. मात्र शेतीचा विकास साधल्या गेला नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र वाढतच आहे. त्यामुळे नवीन संशोधनाद्वारे शेतीचा विकास साधण्याची गरज आहे. त्यासाठी सुरुवातीला स्वामिनाथन आयोग लागू करुन शेतकऱ्यांना चांगल्या बाजारपेठा उपलब्ध करुन देण्याची गरज आहे.

- सुमित सु.ढोक, वर्धा, ता.वर्धा.

## युवकांनी राजकारणात येण्याची गरज

मतदानाचा हक्क हाच लोकशाहीचा पाया आहे. आपल्या एका मताने राजकारण बदलू शकते.



विशेषत: देशात युवकांची मोठी ताकद असून युवकांनी राजकारणात येण्याची गरज आहे. समाज परिवर्तन घडविण्याची ताकद युवकात आहे. याचा नेते मंडळी पद्धतशीरपणे वापर करुन घेतात. युवक शेवटपर्यंत कार्यकर्ते म्हणून राहतात आणि निवडणुकीत मात्र नेत्यांच्या मुलानाच संधी मिळते. म्हणून युवकांनीही आपले संघटन तयार करुन समाजाच्या हितासाठी, बेरोजगारांच्या रोजगारासाठी राजकारणात येण्याची गरज आहे.

- निलेश अ.बोबडे , वर्धा, ता.वर्धा

## मत विकू नका; आपला अधिकार कायम राखा

निवडणुकीच्या दिवसात कधी न दिसणारे नेते मंडळीही मतदारांपर्यंत पोहोचून मतांचा जोगवा मागतात. यावेळी मत मिळविण्याकरिता वाट्टेल ते करतात. परंतु राज्यघटनेने दिलेला अधिकार न विकता तो आपण कायम राखायला हवा. ज्या उमेदवारांना निवडून दिले जाईल, त्यांनी बेरोजगारी, आरोग्य, शिक्षण व शेती प्रश्नांवर लक्ष केंद्रीत करुन सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. तसेच नागरिकांनीही मताचे महत्व जाणून मतदानाचा हक्क बजवावा.



- ऋषिकेश भोंडे, पढेगाव, ता.सेलू

## दिल्ली-मुंबई राखणारे नेते नकोत

नेते मंडळी निवडणुकीत मोठ-मोठी स्वप्ने दाखवून मतदारांचे मत आपल्या झोळीत पाडून घेतात.



मतदारही त्यांच्या गोड आश्वासनांना बळी पडतात. निवडून आल्यावर मात्र, मतदार संघ सोडून दिल्ली-मुंबईतच राहणे पसंत करतात. त्यामुळे मतदार संघातील नागरिकांच्या समस्यांची जाणीव त्यांना होत नाही. ग्रामपंचायतचा जरी विचार केला तर निवडून आल्यानंतर सदस्यही येऊन पाहत नाही. त्यामुळे दिल्ली-मुंबईत राहणारे नेते नकोच. मतदार संघात काम करणाऱ्या नेत्यांचीच गरज आहे.

- विपश्यना सु. इंगळे, वर्धा, ता. वर्धा